# महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ

(महाराष्ट्र शासन अंगिकृत)

"उद्योग सारथी", मरोळ औद्योगिक क्षेत्र, महाकाली गुंफा मार्ग, अंधेरी (पूर्व), मुंबई-९३

क्र.मऔविम/म.व्य(भूमी)/C69593 दिनांक: 22/10/2020

## परिपत्रक

विषय:- **कोरोना विषाणूंचा(Covid-१९) चा वाढता प्रादुर्भाव विचारात घेता उद्योजकांना विविध शुल्क भरण्याकरीता विलंबशुल्क न आकारता कालावधी वाढविणे तसेच विनाशुल्क मुदतवाढ मंजूर करणेबाबत व इतर बाबींबाबत..**

संदर्भ :- परिपत्रक क्र. मऔविम/म.व्य.(भूमी)/B ५०८४९ दिनांक ०१.०७.२०२०

कोरोना विषाणूंचा (Covid-१९) चा वाढता प्रार्दुभाव व कोविड १९ च्या आपत्तीमुळे निर्माण झालेल्या परिस्थितीत व्यवसाय सुलभीकरणाच्या(Ease of Doing Business) अनुषंगाने केंद्र शासनाने निर्गमित केलेल्या दिनांक २८.०५.२०२० च्या सूचना व त्या अनुषंगाने नगर विकास विभाग यांनी दिनांक ०८.०६.२०२० रोजीच्या पत्रान्वये नगर विकास विभाग(नवि-१३) यांच्या शासन निर्णय दिनांक ०४.०६.२०२० नुसार कार्यवाही करण्यात यावी असे निर्देश दिलेले आहेत.

कोरोना विषाणूंचा (Covid-१९) चा वाढता प्रार्दुभाव व कोविड १९ च्या आपत्तीमुळे निर्माण झालेल्या परिस्थिती विचारात घेता महामंडळाने दिनांक ०१.०७.२०२० च्या परिपत्रकान्वये विलंबशुल्क न आकारता दिनांक ३० सप्टेंबर-२०२० पर्यन्त विविध देय शुल्क भरण्याचा कालावधी तसेच विकास कालावधी/वाढीव विकास कालावधी दिनांक ३० सप्टेंबर, २०२० पर्यन्त वाढविला आहे. तथापि कोरोना विषाणूंचा (Covid-१९) चा वाढता प्रार्दुभावामुळे उदभवलेली परिस्थिती विचारात घेता तसेच शासनाचे उपरोक्त परिपत्रकांन्वये दिलेल्या निर्देशाच्या अनुषंगाने याबाबतचा विषय संचालक मंडळाच्या दिनांक १६.१०.२०२० रोजी झालेल्या ३८७ व्या बैठकीत चर्चा होवून प्रकरणी प्राप्त निर्देशानुसार महामंडळाच्या दिनांक ०१.०७.२०२० रोजी निर्गमित केलेल्या परिपत्रकांत खालीलप्रमाणे सुधारणा करण्यात येत आहेत.

१. दिनांक २२.०३.२०२० पासून नमूद देय शुल्क भरण्याचा कालावधी (विलंब शुल्क न आकारता) दिनांक ३१.१२.२०२० पर्यन्त वाढविण्यात येत आहे.

२. ज्या भूखंडांचा विकास कालावधी/वाढीव विकास कालावधी दिनांक २२.०३.२०२० ते ३०.०६.२०२० मध्ये संपलेला आहे अशा भूखंडांचा विकास कालावधी/वाढीव विकास कालावधी संपलेल्या दिनांकापासून कोणतीही अतिरिक्त प्रिमियम रक्कम न आकारता ३१.१२.२०२० पर्यन्त वाढविण्यात यावा.

midcconsultants.in

For any requirements related to MIDC, please call us at +91 98338 32485 or email us at info@midcconsultants.in

३. ज्या भूखंडाचा विकास कालावधी/वाढीव विकास कालावधी दिनांक ३०.०६.२०२० नंतर संपलेला आहे अशा भूखंडांचा विकास कालावधी मुख्य कार्यकारी अधिकारी यांची मंजुरी घेवून वाढविण्यात यावा.

४. दिनांक २२.०३.२०२० पासून ३१.१२.२०२० कालावधीमध्ये दंडात्मक पोटभाडयाची रक्कम वसूल न करता महामंडळाच्या प्रचलित धोरणानुसार ३ टक्के अथवा ०.५ टक्के दराने पोटभाडयाची रक्कम वसूल करण्यात यावी.

५. दिनांक ०१.०७.२०२० च्या परिपत्रकातील इतर अटी व शर्ती कायम राहतील.

६. सर्व संबंधित प्राधिकरण यांनी मंजूरी दिलेल्या परवानग्या, अनुज्ञप्त्या, नाहरकत प्रमाणपत्रे, बांधकाम प्रारंभ प्रमाणपत्रे, भोगवटा प्रमाणपत्रे, प्राधिकरणांकडे जमा करावयाचे शुल्क इ. ची लॉकडाऊन/अनलॉक कालावधीत समाप्त होणारी वैधनिक मुदत परवानगी पत्रात नमूद केलेल्या पूर्व अटींची पूर्तता करण्यासाठी दिनांक ३१.१२.२०२० पर्यन्त वाढविण्यात यावी. सदरहू वाढीव कालावधीसाठी कोणतेही अतिरिक्त शुल्क अगर व्याज आकारणी करण्यात येवू नये.

७. महामंडळाच्या औद्योगिक पाणी वापरकर्त्यांचा माहे मार्च २०२० ते सप्टेंबर २०२० या कालावधीतील प्रत्यक्ष पाणी वापर कमी झाल्याने, कमीत कमी पाणी वापर परिमाणाची आकारणी करण्यात आली. सदर आकारणी प्रत्यक्ष रिडींगप्रमाणे येणा-या परिमाणापेक्षा जास्त असल्याने, या कालावधीसाठी प्रत्यक्ष रिडींगप्रमाणे पाणी वापर आकारणी सुधारित करण्यात यावी. तसेच या कालावधी दरम्यान उद्योग घटकांनी कमीत कमी पाणी वापर आकारणीची देयके अदा केली नसल्यास आकारलेले विलंब शुल्क देखील सुधारित करण्यात यावे.

सदरहू परिपत्रक मा. मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे मान्यतेने निर्गमित करण्यात येत आहे.

**(अविनाश सुभेदार)**
**सह मुख्य कार्यकारी अधिकारी(प्रशासन)**
**मऔविम, मुंबई.**

प्रति,

१. सर्व विभाग प्रमुख, मऔविम, मुंबई.
२. अतिरिक्त मुख्य अभियंता, मऔविम, पुणे/नांदेड/नागपूर.
३. सर्व अधिक्षक अभियंता, मऔविम.
४. सर्व प्रादेशिक अधिकारी, मऔविम.
५. सर्व कार्यकारी अभियंता, मऔविम.
६. सह मुख्य/उप मुख्य लेखा अधिकारी, मऔविम, मुंबई/पुणे /औरंगाबाद/नागपूर.
७. महाव्यवस्थापक (भूमि)/महाव्यवस्थापक (भूसंपादन)/व्यवस्थापक (भूमि-१/२), मऔविम, मुंबई.
८. प्रशासकीय अधिकारी, मऔविम, मुंबई.

midcconsultants.in

For any requirements related to MIDC, please call us at +91 98338 32485 or email us at info@midcconsultants.in

९. व्यवस्थापक (भूसंपादन-१/२), मऔविम, मुंबई.
१०. जनसंपर्क अधिकारी, मऔविम, मुंबई.
११. सर्व क्षेत्र व्यवस्थापक, मऔविम.
१२. म.औ.वि. महामंडळाचे सर्व संचालक.
१३. सर्व महाव्यवस्थापक, जिल्हा उद्योग केंद्र.
१४. सर्व औद्योगिक संघटना.
१५. मुख्य मध्यवर्ती परिपत्रक नस्ती/मुख्य कार्यकारी अधिकारी, मऔविम, कार्यालय मरोळ/जागतिक व्यापार केंद्र (डब्ल्यू.टी.सी.), कफ परेड, मुंबई

midcconsultants.in

For any requirements related to MIDC, please call us at +91 98338 32485 or email us at info@midcconsultants.in